## उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), रत्नागिरी
## जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांजकडून

### अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक एलएक्यु/एसआर/१३८७/२०१९.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या, तसेच महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ च्या अधिसूचनेनुसार एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता भूसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी साठवण तलाव कोसुंब, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील साठवण तलाव योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा प्रवेश पुच्छ कालवा, विमोचक व पोहोच रस्त्यासाठी भूसंपादन होत असून, यात यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन संपादन करण्याचा, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांचा उद्देश आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनमध्ये देण्यात आलेल्या, सामाजिक प्रभाव आणि सार्वजनिक प्रयोजन यांचे निर्धारण करण्याकरिता प्रारंभिक अन्वेषण करण्यासंबंधातील तरतुदी विचारात घेता, समुचित शासनाने सामाजिक प्रभाव आणि सार्वजनिक प्रयोजन यांचे निर्धारण करण्याकरिता प्रारंभिक अन्वेषण करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, सार्वजनिक प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्याचा समुचित शासनाचा हेतू असल्यास ते बाधित क्षेत्रामधील ग्रामस्तरावर किंवा वॉर्डस्तरावरील संबंधित पंचायत, नगरपालिका किंवा यथास्थिती, महानगरपालिका यांच्याशी विचारविनिमय करून अशा शासनाकडून अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा दिनांकापासून सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास अंमलात आणेल अशी तरतूद उक्त अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) मध्ये करण्यात आली आहे.

त्याअर्थी आता, उक्त कायद्याचे कलम ३ चे पोट-कलम (ई) प्रमाणे, जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना समुचित शासन म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे आणि कलम ३ चे पोट-कलम (ग) नुसार जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी त्यांचे वतीने पुढील कार्यवाही करण्यासाठी उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), रत्नागिरी यांना क्र. भूसं/समन्वय/कार्या-१/कावि-८४६/एसआर क्र.१०३/२०१९, दिनांक ३ एप्रिल २०१९ अन्वये प्राधिकृत केलेले आहे. सबब, याद्वारे उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), रत्नागिरी असे अधिसूचित करीत आहे की, बाधित क्षेत्रामध्ये भाकर सेवा संस्था, मु. पो. कोंडये, ता. लांजा, जि. रत्नागिरी यांच्याकडून भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ मध्ये विहित केलेल्या रितीने दिनांक ४ मार्च २०२१ पासून सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करण्यात येईल.

### अनुसूची

**भूसंपादन संस्थेचे नाव :**—जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, सिंचन भवन, कुवारबाव, रत्नागिरी.

**प्रयोजन :**—साठवण तलाव, कोसुंब, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील साठवण तलाव योजनेच्या सी. मुख्य कामे अंतर्गत धरण तळ सांडवा प्रवेश पुच्छ कालवा, विमोचक व पोहोच रस्त्यासाठी भूसंपादन.

**गावाचे नाव :**—मौजे कोसुंब, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**एकूण क्षेत्र (हे. आर.) :**—०६-९४-५०

| अ.क्र. | जमिनीचे गट नंबर | संपादन करावयाच्या क्षेत्राच्या चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्व | पश्चिम | उत्तर | दक्षिण |
| १ | ६७ पै. | ६७ पै. | ६८ पै. | ६७ पै. | ६७ पै. |
| २ | ६८ पै. | ६७ पै. | ६९,७० पै. | ६८ पै. | ७१ |
| ३ | ६९ पै. | ६८ | ७० | ६९ पै. | ७० |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ४ | ७० पै. | ६८, ७१ | वहाळ | ६९ | ७४ |
| ५ | ७१ पै. | ७१ पै. | ७० | ६८ | ७१ पै. |
| ६ | ७३ पै. | ७३ | ७४ | ७३ पै. | ७४ |
| ७ | ७४ पै. | ७३ पै. | वहाळ | ७० | ७५ |
| ८ | ७५ पै. | ७५ पै. | वहाळ | ७४ | ७६ |
| ९ | ७६ पै. | ७६ पै. | वहाळ | ७५ पै. | ९६ |
| १० | ९६ पै. | ९६ पै. | वहाळ | ७६ | वहाळ |
| ११ | १०४४ पै. | वहाळ | १०४४ पै. | १०४६ | १०४४ पै. |
| १२ | १०४६ पै. | वहाळ | १०४६ पै. | १०४७ | १०४६ पै. |
| १३ | १०४७ | वहाळ | १०४८, १०५१ | वहाळ | १०४६ |
| १४ | १०४८ पै. | १०४६, १०४७ | १०४८, १०५१ पै. | १०५१ | १०४८ पै. |
| १५ | १०५१ पै. | १०४७ | १०५४ | १०५३ | १०५१ पै. |
| १६ | १०५२ | वहाळ | १०५३ | १५६९ | १०५१ |
| १७ | १०५३ पै. | १०५२ | १०५३ पै. | १५६८ | १०५१ |
| १८ | १०५४ पै. | १०५१, १०५३ | १०५४ पै. | १०५४ पै. | १०५४ पै. |
| १९ | १०५५ पै. | १०५४ | १०५५ पै. | १०५५ पै. | १०५५ पै. |
| २० | १५६८ पै. | १५६९ | १५६८, १०५३ पै. | १५६८ पै. | १०५३ |
| २१ | १५६९ पै. | वहाळ | १५६८ | १५६९ पै. | १०५२ |

**सविता लष्करे,**
उप जिल्हाधिकारी (भूसंपादन),
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक ०४ मार्च २०२१.